दैनिक
# महाराष्ट्र जीत
मुख्य संपादक : सागर राणा अंभोरे
RNI No - MHMUL/25/A0788
■ वाशीम ■ शुक्रवार, २९ मे २०२६ ■ वर्ष : ३ ■ अंक : ४२ ■ पाने : ४ ■ किंमत : ५ रूपये ■ Title code:- MAHMUL039353

## ऊस आणि कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांची केंद्र सरकारकडून दखल – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्याशी राज्याच्या प्रतिनिधींची सविस्तर चर्चा

महाराष्ट्र जीत

**नवी दिल्ली :** साखरेच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ करणे, इथेनॉल कोटा वाढवणे, कर्ज पुनर्गठन, व्याज सवलत, शेतकऱ्यांकडून थेट कांदा खरेदी, शेतीमालाचे ग्रेडिंग, कांदा बियाण्यांवर अधिभार आदी शेतकऱ्यांच्या महत्त्वाच्या प्रश्नांबाबत केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्यासोबत झालेल्या सकारात्मक चर्चेमुळे राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून याबाबत लवकरच केंद्र सरकार अनुकूल निर्णय घेणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

नवी दिल्ली येथे महाराष्ट्रातील साखर कारखानदारी, ऊस आणि कांदा उत्पादक शेतकरी यांच्या विविध अडचणींसंदर्भात केंद्रीय सहकार मंत्री शाह यांच्यासोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह संबंधित मंत्री आणि विविध संस्थांच्या प्रतिनिधींची चर्चा झाली.

केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान आणि केंद्रीय सार्वजनिक वितरण मंत्री प्रल्हाद जोशी हेही या बैठकीस उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, जलसंपदा मंत्री गिरीष महाजन, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, पणन मंत्री जयकुमार रावल, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र सिंह भोसले, खा. धनंजय महाडिक, आ. दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, डॉ. राहुल



आहेर, राहुल कुल, अभिमन्यु पवार, डॉ.विनय कोरे, राजेश टोपे, राष्ट्रीय सहकारी साखर महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, राज्य सहकारी साखर महासंघाचे जयप्रकाश दांडेगावकर, रणजितसिंह निंबाळकर, मुख्यमंत्री कार्यालयाचे अतिरिक्त मुख्य सचिव लोकेश चंद्र, सुहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, सहकार आयुक्त दीपक तावरे, कृषी आयुक्त सुरज मांढरे, साखर आयुक्त संजय कोलते आदी उपस्थित होते.

साखरेच्या प्रश्नांवर केंद्रीय सहकार मंत्र्यांसोबत अत्यंत सकारात्मक चर्चा झाल्याबाबत समाधान व्यक्त करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, साखरेची किमान आधारभूत किंमत वाढवणे गरजेचे असल्याचे केंद्रीय मंत्री शाह यांनी मान्य केले आहे. इथेनॉलचा कोटा मोठ्या प्रमाणात वाढवण्यासाठी येत्या दोन महिन्यांत निर्णय घेण्याबाबत त्यांनी सहमती दर्शवली असून कर्ज पुनर्गठनासंदर्भात राज्य शासनासोबत एकत्रितपणे काम करून मार्ग काढण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. त्यासह व्याज सवलतीचे (इंटरेस्ट सबव्हेंशन ) पैसे तात्काळ देण्याचे मान्य करण्यात आले करण्यात आले आहे. 'क्वेल प्राइजिंग' (किंमत नियंत्रण) संदर्भात केंद्राने एक प्रस्ताव मागवला असून, राज्य शासनाकडून तो तयार केला आहे व लवकरच सादर केला जाईल. या प्रकल्पामुळे साखर कारखानदारीचे अनेक प्रश्न सुटण्यास मदत होईल.कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांवरही सकारात्मक निर्णय झाले असल्याची माहिती देऊन मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नाफेड आणि एनसीसीएफने सुरू केलेली कांदा खरेदी बाजारात थेट व्यापाऱ्यांकडून न होता, थेट शेतकऱ्यांकडून केली पाहिजे ही मागणी मान्य करण्यात आली आहे. २ लाख टनांऐवजी १० लाख टन कांदा खरेदी नाफेड आणि एनसीसीएफने करावी, यावर सकारात्मक निर्णय होण्याची अपेक्षा आहे. सध्या कांद्याचे बियाणे मोठ्या प्रमाणात निर्यात होत असल्याने देशांतर्गत कांद्याला एक्सपोर्ट मार्केट उरत नाही. यासाठी कांदा बियाण्यावर मोठ्या प्रमाणात 'एक्सपोर्ट सरचार्ज' लावला पाहिजे, ही मागणी देखील मान्य करण्यात आली आहे. तसेच कांद्याचा खरेदी भाव नुकताच वाढवून १५ रुपये ८० पैसे करण्यात आला आहे. तो आणखी कसा वाढवता येईल यावर चर्चा झाली. कांद्याच्या बियाणांवर निर्बंध असले, तरी कांद्याच्या निर्यातीवर (कांदा पाठवण्यावर) कोणतीही बंदी नाही, असे या चर्चेत स्पष्ट करण्यात आले.

नाफेड किंवा एनसीसीएफमध्ये ग्रेडिंगच्या नावाखाली माल निकृष्ट दर्जाचा दाखवून खरेदी नाकारली जाते, अशी शेतकऱ्यांची तक्रार असते. यावर उपाय म्हणून आता यंत्रसामुग्रीच्या माध्यमातून ग्रेडिंग केले जाईल, ज्यामुळे शेतकऱ्यांना योग्य न्याय मिळणार असल्याबाबत समाधान व्यक्त करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, आंबा आणि हापूस आंब्यासंदर्भात निर्माण झालेल्या प्रश्नांबाबत केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनाही यावेळी निवेदन देण्यात आले. विमा कंपन्यांनी घातलेल्या जाचक अटींमध्ये बदल केल्यास आंबा उत्पादकांना मोठा दिलासा मिळू शकतो, हे त्यांच्या निदर्शनास आणून दिले. यावर केंद्रीय मंत्र्यांनी विमा कंपन्यांची बैठक घेऊन योग्य मार्ग काढण्याचे आश्वासन दिले असल्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

## प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालयांचे अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर करण्यात येणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

महाराष्ट्र जीत

**भिवंडी (सुनील झळके) :** महाराष्ट्रातील येरवडा, ठाणे, रत्नागिरी आणि नागपूर येथील प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालयांचे अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर करणे हा केवळ आरोग्य व्यवस्थेचा विस्तार नसून, गुणवत्तापूर्ण उपचार, संशोधन आणि प्रशिक्षित मनुष्यबळ निर्मितीच्या दिशेने टाकलेला दूरदर्शी आणि मानवकेंद्री पाऊल आहे. यामुळे समाजातील वंचित घटकांपर्यंत अधिक सक्षम, सुलभ आणि आधुनिक मानसिक आरोग्य सेवा पोहोचविण्याचा आमचा संकल्प अधिक बळकट होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र राज्यातील येरवडा (पुणे), ठाणे, रत्नागिरी आणि नागपूर येथील चार प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालये समाजातील विशेषतः वंचित घटकांना मोठ्या प्रमाणावर आरोग्य सेवा पुरवत आहेत. बाह्यरुग्ण व आंतररुग्ण सेवांद्वारे ही रुग्णालये हजारो रुग्णांना उपचार देत असून, सुमारे ५७०० खाटांची सुविधा उपलब्ध असल्यामुळे त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा व मनुष्यबळ आहे. या पार्श्वभूमीवर, राज्य शासनाने या रुग्णालयांचे अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर करण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव पुढे आणला आहे. या उपक्रमामुळे मानसिक आरोग्य क्षेत्रात दर्जेदार उपचार सेवांसोबतच शिक्षण आणि संशोधनालाही चालना मिळणार आहे.

**केंद्र शासनाच्या योजनेशी सुसंगत उपक्रम**

केंद्र शासनाच्या मॅनपॉवर डेव्हलपमेंट स्कीम अंतर्गत, स्ट्रेंथनिंग पीजी डिपार्टमेंट इन मेंटल हेल्थ स्पेशालिटिज (स्कीम बी) या योजनेनुसार मानसिक आरोग्य क्षेत्रात प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता दूर करण्यासाठी उपाययोजना करण्यात येत आहेत. राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत (एनएमएचपी) १२व्या पंचवार्षिक योजनेपासून या दिशेने विशेष भर देण्यात आला आहे. ज्या ठिकाणी आधीपासून पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत, अशा प्रादेशिक रुग्णालयांमध्ये मानसिक आरोग्याशी संबंधित पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे.

**शासन निर्णय आणि अभ्यासक्रमांची सुरुवात**

राज्य शासनाने १६ सप्टेंबर २०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करून खालील अभ्यासक्रमांना मान्यता दिली आहे:

एम.डी. सायकिअ‍ॅट्री

एम.फिल क्लिनिकल सायकॉलॉजी

एम.फिल सायकियाट्रिक सोशल वर्क

डिप्लोमा इन सायकियाट्रिक नर्सिंग

हे अभ्यासक्रम प्रादेशिक मनोरुग्णालय ठाणे, पुणे (येरवडा) आणि नागपूर येथे सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**नागपूर येथे एम.डी. सायकिअ‍ॅट्रीला सुरुवात**

प्रादेशिक मनोरुग्णालय नागपूर येथे वैद्यकीय शिक्षण विभाग व सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या संयुक्त प्रयत्नांतून एम.डी. सायकिअ‍ॅट्री अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे.

इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथील अध्यापकांच्या सहकार्याने हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून सुरू झाला असून, दरवर्षी ४ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात आहे. आजपर्यंत १२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून, त्यापैकी २ विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केला आहे.

**नर्सिंग क्षेत्रातही प्रगती**

प्रादेशिक मनोरुग्णालय ठाणे व पुणे येथे डिप्लोमा इन सायकियाट्रिक नर्सिंग अभ्यासक्रम २०२२-२३ पासून सुरू करण्यात आला आहे.प्रत्येक ठिकाणी दरवर्षी २० विद्यार्थी प्रवेश घेत आहेत. आतापर्यंत ठाणे येथून ५९ आणि पुणे येथून ६० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या उपक्रमामुळे मानसिक आरोग्य क्षेत्रात प्रशिक्षित नर्सिंग कर्मचाऱ्यांची उपलब्धता वाढण्यास मदत होत आहे.

या चारही प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालयांचे पूर्णतः अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर केल्यामुळे पुढील फायदे अपेक्षित आहेत. रुग्णांना अधिक दर्जेदार आणि विशेषज्ञ उपचार सेवा. मानसिक आरोग्य क्षेत्रात प्रशिक्षित डॉक्टर, मानसशास्त्रज्ञ व सामाजिक कार्यकर्त्यांची संख्या वाढ. संशोधन आणि नवोपक्रमाला चालना. ग्रामीण व वंचित भागांपर्यंत गुणवत्तापूर्ण मानसिक आरोग्य सेवा विस्तार होणार.महाराष्ट्रातील प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालयांचे अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर हा केवळ आरोग्य क्षेत्रातील नव्हे तर शिक्षण आणि सामाजिक विकासाच्या दृष्टीनेही एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. केंद्र व राज्य शासनाच्या समन्वयातून राबविण्यात येणारा हा उपक्रम राज्यातील मानसिक आरोग्य सेवांना नवे बळ देणारा ठरेल.

## मच्छीमारांनो सावधान..! १ जूनपासून समुद्रात मासेमारीला बंदी ; नियमांचे उल्लंघन केल्यास होणार कडक कारवाई

महाराष्ट्र जीत

**भिवंडी(सुनील झळके) :** ठाणे आणि पालघर जिल्ह्यांतील मच्छीमारांसाठी एक अत्यंत महत्त्वाची बातमी आहे. समुद्रातील मासळीच्या साठ्याचे जतन करण्यासाठी आणि पावसाळ्यातील वादळी हवामानापासून मच्छीमारांच्या जीविताचे रक्षण करण्यासाठी शासनाने यंदा १ जून ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत पावसाळी मासेमारीवर अधिकृत बंदी जाहीर केली आहे. ठाणे-पालघर जिल्ह्याचे मत्स्यव्यवसाय सहाय्यक आयुक्त (तांत्रिक) दिनेश पाटील यांनी या संदर्भातील अधिकृत माहिती दिली आहे.

या दोन महिन्यांच्या कालावधीत समुद्रातील माशांचा प्रजोत्पादन काळ असतो, त्यामुळे या बंदीमुळे मासळीच्या बीज निर्मिती प्रक्रियेला मोठा वाव मिळून समुद्रातील मासळीचा साठा वाढण्यास मदत होते.

मत्स्यव्यवसाय विभागाने दिलेल्या आदेशानुसार, ही पावसाळी मासेमारी बंदी सर्व प्रकारच्या यंत्रचलित आणि यांत्रिक नौकांना पूर्णपणे लागू राहील. मात्र, पारंपरिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्या बिगर-यंत्रचलित नौकांना या बंदीतून सवलत देण्यात आली आहे. सध्या समुद्रात गेलेल्या सर्व यांत्रिक नौकांनी ३१ मे २०२६ पूर्वीच आपापल्या बंदरांमध्ये परतणे बंधनकारक करण्यात आले असून, १ जून किंवा त्यानंतर कोणत्याही परिस्थितीत बंदरांवर मासे उतरवण्यास परवानगी दिली जाणार नाही. तसेच,




राज्याच्या सागरी किनाऱ्यापासून १२ सागरी मैलांपर्यंतच्या क्षेत्राबाहेर खोल समुद्रात जाणाऱ्या नौकांना केंद्र शासनाचे धोरण व मार्गदर्शक सूचना लागू राहतील.

या शासकीय नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन सर्व मच्छीमार सहकारी संस्थांना करण्यात आले आहे. जर बंदीच्या काळात कोणतीही यांत्रिक नौका बेकायदेशीरपणे मासेमारी करताना आढळली, तर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियमांतर्गत ती नौका, त्यावरील उपसाधने आणि पकडलेली मासळी जप्त करून संबंधित मालकावर अत्यंत कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. इतकेच नव्हे तर, बंदीच्या काळात समुद्रात जाऊन अपघात झाल्यास अशा नौकेला शासनाकडून कोणतीही आर्थिक नुकसान भरपाई मिळणार नाही, असेही शासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे सर्व नौकामालकांनी नियमांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन मत्स्यव्यवसाय विभागाकडून करण्यात आले आहे.

## पर्यावरण वाचवा भविष्य वाचवा

### झाडे लावा, प्रत्येक जण ; शुद्ध हवा घेऊ सर्वजण ."

महाराष्ट्र जीत

**रिसोड प्रतिनिधी :** यावर्षीचे म्हणजेच 2026 चे तापमान पाहता निसर्गाचा पूर्णपणे समतोल बिघडल्यासारखे दिसत आहे आता पर्यावरण वाचवण्यासाठी सर्वांनी मिळून मनातून संकल्प करण्याची वेळ आली आहे. कारण पर्यावरणाचा समतोल बिघडल्यामुळे फक्त तापमान नाही तर अवकाळी पाऊस, अति पर्जन्यमान कमी पर्जन्यमान यामुळे ओला दुष्काळ कोरडा दुष्काळ याला सामोरे जावे लागत आहे हे असेच राहिले तर सजीव सृष्टीसाठी धोक्याची घंटा आहे. त्यामुळे पर्यावरण वाचवणे हा एकमेव पर्याय आहे. त्यासाठी झाडे लावणे व त्याचे संवर्धन करणे गरजेचे आहे कारण झाडे हे पृथ्वीचे फुफ्फुसे आहेत. कारण सजीव सृष्टीला जिवंत राहण्यासाठी लागणारा ऑक्सिजन हा झाडामुळेच मिळतो.झाडांची संख्या वाढली तरच आपण पुढच्या पिढीला शुद्ध हवा देऊ शकु.

**झाडांना शुद्ध मातीची गरज**

शुद्ध माती असेल तरच झाडे वाचतील आणि झाडे वाचले तरच पर्यावरण चांगले होऊन सजीव सृष्टी वाचेल.

म्हणून सध्या होत असलेल्या रासायनिक खते औषधांचा अतिवापर त्यामुळे या घातक औषधाने माती पूर्णपणे निष्क्रिय झाली आहे मातीमधील मित्रकीड पूर्ण नष्ट झाली व सुपीकता पूर्ण नाहीशी झाली आहे मातीमध्ये पाणी शोषून घेण्याची क्षमता राहिली नाही त्यामुळे पावसाळ्यामध्ये पर्जन्यमान कितीही झाले तर ते जमिनीत न राहता वाहून जाते. व परिणामी समोर उन्हाळ्याच्या सुरुवातीपासूनच पाण्याचा दुष्काळ पडतो व समोर तो तीव्र होतो म्हणून माती वाचवायची असेल तर नैसर्गिक शेतीचा अवलंब करावा लागेल चला तर मग 5 जून पर्यावरण दिनापासून एक संकल्प करूया पर्यावरणासाठी झाडे लावून जगवूया माती पाणी वाचवूया.

**भाऊसाहेब सरनाईक**
**पत्रकार तथा**
**निसर्गप्रेमी**

## प्रा. दिनेश राऊत यांचा संगठन बांधणीसाठी मराठवाडा दौरा

महाराष्ट्र जीत

**परभणी -** बुद्धिस्ट इंटरनॅशनल नेटवर्कच्या वाढ- विस्तारासाठी संपूर्ण महाराष्ट्रातील विभागाचे दौरा नियोजन करण्यात आलेली आहे. संघटनात्मक वाढ विस्ताराचे उद्दिष्ट समोर ठेवून प्रा. दिनेश राऊत ( प्रदेश अध्यक्ष बुद्धिस्ट इंटरनॅशनल नेटवर्क महाराष्ट्र राज्य ) यांनी मराठवाडा दौरा सुरू केला आहे. मराठवाडा विभागातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये कार्यनिष्पादन समितीचे गठन करणे हा प्रमुख उद्देश असून लोकांना संघटनेमध्ये जोडण्याचे कार्य मराठवाडा



विभागामध्ये झपाट्याने सुरू आहे. या नियोजित दौऱ्यामध्ये दिवसाला दोन मिटिंगचे नियोजन असून प्रबोधन संमेलन देखील विहारांमध्ये आयोजित केली जात आहेत. मराठवाडा विभाग स्तरीय अनुसूचित जाती जागृती प्रबोधन संमेलन मा. वामन मेश्राम साहेब ( राष्ट्रीय अध्यक्ष भारत मुक्ती मोर्चा,नई दिल्ली) यांच्या



अध्यक्षतेमध्ये २० जून रोजी आयोजित केलेली आहे. अनुसूचित जातीमध्ये संघटित शक्ती निर्माण करण्यासाठी आणि कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी हा प्रामुख्याने दौरा केल्या जात असल्याची माहिती आहे. संघटनात्मक बांधणीसाठी मोठ्या प्रमाणात पदाधिकारी, कार्यकर्ते जोडले जात असून या दौऱ्याला प्रचंड प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे.

## संपादकीय

### अब्राहम आग्रहाचे अराजक!

अमेरिका आणि इस्रायलने फुटकळ कारणांसाठी इराणवर भीषण हल्ले करून सुरू केलेल्या युद्धास आज, २८ मे रोजी तीन महिने पूर्ण होतील. त्या संघर्षास तूर्त स्थगिती मिळाली आहे, पण तो पूर्णविराम नव्हे. तसे पाहिल्यास, रात्र-रात्र जागून युद्धासारख्या जागतिक समस्यांवर विचारमंथन करणे आणि रात्रीच शक्यतो त्या समस्यांवर तोडगा काढणे हा अमेरिकेचे विद्यमान अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा आवडीचा छंद. रोजच्या रोज समस्या बदलेल वा न बदलेल, पण तोडगा मात्र नवाच हवा! एखाद्या समस्येवर आज एक तोडगा असेल, तर उद्या त्याच समस्येवर निराळा तोडगा. पुन्हा 'काल तुम्ही या विषयावर वेगळे बोलला होतात' असे म्हणण्याची हिंमत असलेले महानुभाव ट्रम्प यांच्या टोळक्यात नाहीत. कदाचित काल आपण एखाद्या विषयावर काय बोललो हे ट्रम्प यांनाही दुसऱ्या दिवशी स्मरत नसेल. इराण युद्ध थांबवण्यासाठी त्यांनी जो ताजा तोडगा सुचवला, तोही त्यांना येत्या काही दिवसांत आठवणार नाही. पण त्यांच्या नवीन सूचनावजा आदेशाने इराण युद्धसमाप्तीची बोलणी फिस्कटू शकतात आणि इंधनटंचाईच्या झळा जगाला आणखी अनंत काळ सोसाव्या लागू शकतात, त्यामुळे तोडग्याचा श्लेष आवश्यक.

इराणशी जो काही सौदा (ट्रम्प यापेक्षा वेगळे काय करू शकतात?) करायचा, त्यात भागीदारी हवी असेल तर संबंधित देशांनी अमेरिकेच्या पुढाकाराने आणि इस्रायलला गोंजारण्यासाठी घडवून आणलेल्या 'अब्राहम करारा'तही सहभागी झाले पाहिजे असा आग्रह ट्रम्प यांनी काही अरब आणि मुस्लीम देशांपाशी धरला आहे. हे देश आहेत सौदी अरेबिया, कतार, तुर्कीये, इजिप्त आणि पाकिस्तान. अब्राहम करारात जे सहभागी होत नाहीत, त्यांना इराण सौद्याचा मार्गही बंद. ही विचित्र अट संबंधित देशांसाठी धक्कादायक खरीच. कारण यांतील बहुतेक देश, विशेषत: कतार आणि पाकिस्तान इराण युद्धसमाप्तीसाठी अमेरिका आणि इराण यांच्यात वाटाघाटी घडवून आणत आहेत. इराणवर 'लष्करी कारवाई'ला २८ फेब्रुवारी रोजी सुरुवात झाली. एप्रिलच्या सुरुवातीस या कारवाईस दोन्ही देशांच्या संमतीने स्थगिती देण्यात आली. या युद्धविरामाचा उद्देश युद्धसमाप्तीसाठी काही तरी शाश्वत स्वरूपाचा तोडगा शोधून काढणे, असा सांगितला जातो. ती बोलणी जेथे सुरू झाली, तेथेच थिजलेल्या अवस्थेत आहेत. कारण होर्मुझ सामुद्रधुनीची नाकेबंदी आणि इराणच्या ताब्यातील युरेनियम समृद्धीकरणाची मर्यादा या दोन कळीच्या विषयांवर मतैक्य अजिबात संभवत नाही. हे दोन विषय सोडून इतर बाबींची चर्चा म्हणजे वेळेचा आणि पैशाचा अपव्यय. त्यात पुन्हा आता या अब्राहम कराराची नवी पाचर.

अमेरिकेच्या अध्यक्षपदी आपण विराजमान झाल्यानंतर 'प्रचंड यशस्वी' अशा असंख्य निर्णयांपैकी एक म्हणजे हा अब्राहम करार, असे ट्रम्प मानून चालतात. डोनाल्ड ट्रम्प २०१६ ते २०२० या काळात पहिल्यांदा अमेरिकेचे अध्यक्ष होते, त्या वेळी पश्चिम आशियात पॅलेस्टाइन प्रश्न मार्गी लावण्यात त्यांचे हितसंबंध गुंतलेले होते. वरकरणी हा उद्देश असला, तरी त्यात इस्रायलचे आणि अमेरिकेतील इस्रायलवादी रिपब्लिकन धनाढ्यांचे हितच अभिप्रेत होते. म्हणूनच याकामी कोण्या मुत्सद्द्यावर भरवसा न ठेवता त्यांनी आपले जामात जॅरेड कुश्नेर यांना आखातात वारंवार धाडले. त्या काळात आणि विशेषत: इस्रायलचे नरसंहारी पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांच्या अमदानीत इस्रायलने पश्चिम किनारपट्टी आणि गाझा पट्टी या पॅलेस्टिनी मुलुखांत पद्धतशीर विस्तार सुरू केला होता. त्यास पॅलेस्टिनींचा कडाडून विरोध होत होता. त्याची दखल अरब देशांकडून घेतली जात होती. इस्रायलच्या विस्तारवादाकडून लक्ष दुसरीकडे वळवायचे, तर त्यासाठी प्रथम अरब देशांकडून इस्रायलला मान्यता मिळवणे हे पहिले पाऊल. ते मिळवण्यासाठी ट्रम्प यांनी अब्राहम कराराची संकल्पना मांडली. ख्रिस्ती, इस्लाम आणि यहुदी या तीन 'अब्राहमिक' (या तीनही धर्मांचा उगम अब्राहम या आद्य प्रेषितापासून होतो.

## जनगणनेत अनुसूचित जातीच्या अचूक नोंदीसाठी जागरूकता आवश्यक

महाराष्ट्र जीत

देशात सध्या भारताची जनगणना-२०२७ चा पहिला टप्पा सुरू आहे.राष्ट्रीय जनगणना २०२७ संदर्भात विशेषतः धर्म आणि जात या विषयावर मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू आहे. आंबेडकरी समाजामध्ये "धर्म बौद्ध लिहायचा का?", "जात महार नमूद करायची की नाही?" यासारख्या प्रश्नांवर विविध स्तरांवर मतमतांतरे व्यक्त होत आहेत.सोशल मीडिया,विविध संघटनांच्या बैठका आणि सार्वजनिक चर्चांमधून या विषयावर वैचारिक वातावरण निर्माण झाले आहे.मात्र कोणतीही भूमिका घेताना शासनाची प्रत्यक्ष जनगणना प्रक्रिया,तिचे टप्पे आणि त्यामध्ये विचारले जाणारे मुद्दे समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

भारताची जनगणना ही जगातील सर्वात मोठी सांख्यिकीय आणि प्रशासकीय मोहीम मानली जाते.२०११ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १२१ कोटींपेक्षा अधिक होती,तर आगामी जनगणनेमध्ये देशाची लोकसंख्या १४५ कोटींच्या पुढे गेल्याचा अंदाज आहे.या व्यापक प्रक्रियेसाठी राष्ट्रीय पातळीवर ३२ लाख तसेच राज्य पातळीवर राष्ट्रीय पातळी अंतर्गत २ लाख ६४ हजार प्रगणक आणि पर्यवेक्षक नियुक्त करण्यात आले असून प्रथमच मोठ्या प्रमाणावर मोबाईल ॲपच्या माध्यमातून ऑनलाइन माहिती संकलित केली जात आहे.त्यामुळे माहिती अधिक अचूक,वेगवान आणि पारदर्शक पद्धतीने शासनाकडे जमा होत आहे.

राष्ट्रीय जनगणना २०२७ ही दोन टप्प्यांमध्ये होत आहे. पहिल्या टप्प्यातील पहिल्या भागात १ मे २०२६ ते १५ मे २०२६ या कालावधीत नागरिकांना "स्व-जनगणना" (Self Enumeration) करण्याची संधी देण्यात आली होती.त्यानंतर पहिल्या टप्प्यातीलच दुसऱ्या भागामध्ये १६ मे २०२६ ते १५ जून २०२६ दरम्यान शासनाने नियुक्त केलेले प्रगणक घराघरात जाऊन माहिती संकलित करत आहेत.या प्रक्रियेमध्ये घराची स्थिती, भौतिक सुविधा,कुटुंब प्रमुख, सदस्यांची संख्या,पिण्याचे पाणी,शौचालय,इंटरनेट,इंधन सुविधा यांसह एकूण ३३ मुद्द्यांवर माहिती घेतली जात आहे.ही सर्व माहिती प्रगणकांना देण्यात आलेल्या विशेष मोबाईल ॲपमध्ये ऑनलाइन भरली जात आहे.

यामध्ये सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे अनुक्रमांक १३ होय.या मुद्द्यानुसार संबंधित व्यक्ती अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती किंवा इतर कोणत्या प्रवर्गात येते का,याची नोंद घेतली जात आहे.त्यामुळे अनुसूचित जाती-जमातीतील नागरिकांनी या मुद्द्याकडे विशेष लक्ष देणे अत्यंत आवश्यक आहे.सध्या सुरू असलेल्या या टप्प्यात "धर्म कोणता?" किंवा "जात नेमकी कोणती?" असा तपशीलवार प्रश्न विचारला जात नाही. फक्त तुम्ही अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती प्रवर्गात मोडता का,एवढीच प्राथमिक माहिती नोंदवली जात आहे. त्यामुळे सध्या धर्म आणि जातीच्या नावांवर सुरू असलेली चर्चा या टप्प्यात प्रत्यक्ष लागू होत नाही हे समाजाने समजून घेणे गरजेचे आहे.

प्रगणकाने घरावर जनगणनेचा क्रमांक लिहिल्यानंतर तो जेव्हा प्रत्यक्ष माहिती घेण्यासाठी येईल,तेव्हा नागरिकांनी स्वतः जागरूक राहणे अत्यंत महत्त्वाचे आहे. "आपण अनुसूचित जातीचे आहात का?" असा प्रश्न विचारल्यास स्पष्टपणे योग्य माहिती द्यावी आणि प्रगणकाने अनुक्रमांक १३ मध्ये अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीसमोर ऑनलाइन टिकमार्क केला आहे का,याची स्वतः खात्री करून घ्यावी.सर्व ३३ मुद्द्यांची माहिती भरल्यानंतर अंतिम पुष्टीकरण करण्यापूर्वी संपूर्ण माहिती काळजीपूर्वक तपासावी.विशेषतः अनुसूचित जातीची नोंद अचूक झाली आहे का,हे पाहणे अत्यंत आवश्यक आहे.

कारण जनगणनेतील ही माहिती भविष्यात शासनाच्या विविध योजना,शैक्षणिक आरक्षण,शिष्यवृत्ती,सामाजिक न्याय,राजकीय प्रतिनिधित्व आणि घटनात्मक अधिकारांच्या धोरणांसाठी आधार ठरणार आहे.२०११ च्या जनगणनेनुसार देशातील अनुसूचित जातींची लोकसंख्या सुमारे १६.६ टक्के तर अनुसूचित जमातींची लोकसंख्या सुमारे ८.६ टक्के होती.महाराष्ट्रात अनुसूचित जातींचे प्रमाण जवळपास ११ ते १२ टक्क्यांच्या दरम्यान आहे. त्यामुळे या समाजघटकांची अचूक नोंद होणे ही केवळ औपचारिक प्रक्रिया नसून सामाजिक आणि घटनात्मक अस्तित्वाचा प्रश्न आहे.

जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्यात, म्हणजे फेब्रुवारी २०२७ मध्ये होणाऱ्या विस्तृत लोकसंख्या गणनेत प्रत्येक कुटुंबातील सदस्यांचे वय,शिक्षण, व्यवसाय,आर्थिक स्थिती,धर्म आणि जात याविषयी सविस्तर माहिती विचारली जाणार आहे. त्या वेळी धर्म आणि जातीसंदर्भातील माहिती अधिकृतरीत्या नोंदवली जाईल.त्यामुळे आजच्या टप्प्यात समाजाने अनावश्यक संभ्रमात न राहता सध्याच्या प्रक्रियेतील महत्त्वाच्या बाबींवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

आजची खरी गरज जनजागृती करण्याची आहे.कारण सध्या सुरू असलेल्या जनगणना प्रक्रियेत एकूण ३३ मुद्द्यांवर माहिती घेतली जात असून अनुक्रमांक १३ नुसार अनुसूचित जाती-जमातीची योग्य नोंद होणे अत्यंत महत्त्वाचे आहे.त्यामुळे प्रत्येक नागरिकाने प्रगणक भरत असलेली माहिती स्वतः तपासून पाहावी आणि अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीची नोंद अचूकपणे झाली आहे का, याची खात्री करून घ्यावी. जनगणना ही केवळ लोकसंख्या मोजण्याची प्रक्रिया नसून समाजाच्या भविष्यातील अधिकार,योजना आणि प्रतिनिधित्व निश्चित करणारा अत्यंत महत्त्वाचा घटनात्मक दस्तऐवज आहे.

**@उज्वलकुमार भारतीय.**
**छत्रपती संभाजीनगर.**

## महाराष्ट्राच्या अध्यक्षा आद . रेखाताई ठाकूर यांच्या आदेशाने वंचित बहुजन महिला आघाडीत काम करणाऱ्या इच्छुक महिलांच्या मुलाखतीचे आयोजन

महाराष्ट्र जीत

**नाशिक प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** वंचित बहुजन महिला आघाडीच्या माध्यमातून नाशिक शहरांमध्ये महिला कार्यकारणी करायची आहे तरी नाशिक शहरातील सर्व आजी-माजी महिला नी आपल्या कॉन्टॅक्ट मधल्या सर्व जाती धर्मातील महिलांना पक्षांमध्ये येण्यास प्रवृत्त करणे नाशिक पूर्व नाशिक पश्चिम देवळाली विधानसभा नाशिक मध्य या भागातील सर्व महिलांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून वंचित बहुजन आघाडी मध्ये काम करण्यासाठी पदांची मुलाखती देऊन वंचित बहुजन आघाडीमध्ये बाळासाहेबांचे हात बळकट करण्यासाठी समाजातल्या प्रत्येक महिलांनी पुढे आले पाहिजे येत्या 31 तारखेला



रेखाताई ठाकूर



उर्मिला ताई गायकवाड

रविवारी दुपारी 11 ते ४ पर्यंत मुलाखती घेण्यात येतील तरी सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे ही नम्र विनंती महाराष्ट्राच्या अध्यक्षा आद. रेखाताई ठाकूर यांच्या आदेशाने महिला कार्यकर्त्यांच्या मुलाखतीचे आयोजन करण्यात आले आहे नाशिक जिल्हाध्यक्ष उर्मिला गायकवाड कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती नाशिक जिल्हा अध्यक्ष चेतन भाऊ गांगुर्डे नाशिक शहर अध्यक्ष दिनेश जाधव तसेच हिंगोली माजी जिल्हाध्यक्ष डॉक्टर चित्राताई कुऱ्हे हे सर्व उपस्थित राहणार आहे तरी नाशिक शहरातील सर्व जाती धर्माच्या महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मुलाखतीमध्ये सहभाग नोंदवावा असे विनंतीपूर्वक आव्हान महिला जिल्हाध्यक्ष उर्मिलाताई गायकवाड यांनी यावेळी केले आहे.

## नमस्ते नाशिक फाउंडेशन चा उपक्रम गरजू अपंग बांधवांना परिवाराला किराणा वस्तूचे वाटप

महाराष्ट्र जीत

**नाशिक प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** "तुमचा छोटासा सहभाग एखाद्या कुटुंबासाठी जगण्याची नवी आशा ठरू शकतो."जीवनात मागे बघाल तर अनुभव मिळेल,पुढे बघाल तर आशा मिळेल,इकडे-तिकडे बघा तर सत्य दिसेल,आणि स्वतःच्या अंतरात्म्यात डोकावाल तर आत्मविश्वास मिळेल.

याच आत्मविश्वासातून नमस्ते नाशिक फाउंडेशन यांच्या वतीने गरजू व अपंग कुटुंबांना किराणा वस्तूंचे वाटप करण्यात आले.भारतामध्ये अनेक कुटुंबे आर्थिक अडचणींमध्ये जीवन जगत आहेत. अनेक महिलांच्या पतींना नियमित उत्पन्न नसल्यामुळे त्यांच्या कुटुंबासमोर उपासमारीचे संकट निर्माण होते. अशा परिस्थितीत पौष्टिक, स्वच्छ आणि ताजे अन्न मिळणे ही त्यांची अत्यंत मूलभूत गरज ठरते.

या सामाजिक जाणिवेतून नमस्ते नाशिक फाउंडेशनच्या अध्यक्षा सौ. स्नेहल देव यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. \

समाजातील गरजू बांधवांना मदतीचा हात देत त्यांच्या जीवनात आनंद, आधार आणि आशेचा किरण निर्माण करण्याचा हा



छोटासा प्रयत्न आहे.

या उपक्रमासाठी श्री. अजय देव व सौ. कमल पाटील व श्री नहार यांचे मोलाचे सहकार्य लाभले, नमस्ते नाशिक फाउंडेशन यांच्या वतीने आपणास आवाहन करण्यात येते की, आपणही या समाजोपयोगी उपक्रमात सहभागी होऊन गरजूंच्या जीवनात आशेचा किरण निर्माण करावा. चला, एकत्र येऊन माणुसकीची नवी ओळख निर्माण करूया आणि समाजासाठी प्रेरणादायी कार्याचा भाग बनूया. असे आव्हान नमस्ते फाउंडेशनचे अध्यक्ष व सर्व पदाधिकारी यांनी यावेळी केले

## सावित्रीबाईंच्या लेकींचा कारंजात गौरव ; राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा उत्साहात

महाराष्ट्र जीत

**नकुल उपाध्ये / कारंजा लाड:** 'स्त्री म्हणजे चूल आणि मूल' ही चौकट मोडून काढत समाजासाठी झटणाऱ्या रणरागिणींचा कार्य गौरव सन्मान सोहळा कारंजा नगरीत दि. २४ मे रोजी स्व . प्रकाश दादा डहाके सभागृहात कारंजा येथे संपन्न झाला . कार्यक्रमाच्या प्रमुख अध्यक्ष पदी कारंजा-मानोरा मतदारसंघाच्या आमदार श्रीमती सईताई प्रकाश पाटील डहाके होत्या तर प्रमुख उपस्थीतीत सेवा निवृत्त न्यायधीश डॉ संतोष कुमार जैस्वाल; लोक कलावंत पत्रकार संजय कडोळे; साहीत्यीक पुष्पराज गावंडे;डॉ किरण खेडेकर;



चंद्रशेखर भुयार;वैदर्भीय नाथ समाजसंघाचे अध्यक्ष एकनाथ पवार; विजय कुमार ठाकूर; पंडलीक गोसावी;सौ तेजस्वीनी डहाके;नंदकिशोर कव्हळकर;वसंत ठाकरे ;पौर्णिमा माटे इत्यारी मान्यवरांची उपस्थीती होती . कार्यक्रमाची सुरवात सावीत्री बाई फुले यांचे प्रतीमेचे पुजनाने झाली . सावीत्री बाई फुले संस्थेच्या अध्यक्षा सौ शारदा अतुल भुयार यांनी कार्यक्रमाने प्रास्ताविक केले . महीला कार्य गौरव सोहळ्या करीता विदर्भ मराठवाडा खांदेश पश्चीम महाराष्ट्रातून कर्तृत्ववान महीला दाखल होत्या . आमदार सईताई



डहाके यांनी कर्तृत्ववान महिलांचा कार्य गौरव करीत त्यांना शाल श्रीफळ भेटवस्तू प्रशस्ती पत्र देऊन सन्मानीत केले . याप्रसंगी आमदार श्रीमती सईताई डहाके सह मान्यवरांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले .

या कार्यक्रमाचेआयोजन अध्यक्षा सौ. शारदाताई भुयार यांनी केले . संस्थेच्या सचिव माधुरी विवेकानंद वाडेकर यांनी सूत्रसंचालन तर प्रा. बोबडे मॅडम यांनी आभार मानले. सुरुची भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली .

### देगलूर येथे गॅस सिलेंडर घरपोसेवा देण्याची शिवसेना (ठाकरे) पक्षाची मागणी

## गॅस सिलेंडर घरपोच सेवा मिळत नसल्याने वृद्ध पुरुष व महिलांसह सामान्य नागरिकांचे भर उन्हात आर्थिक शारीरिक व मानसिक हाल

महाराष्ट्र जीत

**देगलूर तालुका प्रतिनिधी/ संघपाल मदने :** देगलूर येथील बिरादर गॅस एजन्सीकडून मागील दोन ते तीन महिन्यांपासून गॅस सिलेंडरचा घरपोच पुरवठा बंद असल्याने ग्राहकांना भर उन्हात दिवसभर रांगेत उभे राहावे लागत आहे. यामुळे वृद्ध महिला व नागरिकांना मानसिक, शारीरिक आणि आर्थिक त्रास सहन करावा लागत असून, गॅस सिलेंडर पूर्ववत घरपोच सेवा सुरू करण्याची मागणी शिवसेना (ठाकरे) पक्षाचे उपजिल्हाप्रमुख महेश पाटील यांनी जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडे केली आहे.

महेश पाटील यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, देगलूर येथील एकमेव बिरादर गॅस एजन्सी दोन महिन्यांपासून गॅस





सिलेंडर घरपोच सेवा देत नाही तसेच एजन्सीसमोरच सिलेंडरचे वाटप होत असल्याने तिथे मोठी गर्दी होत आहे. त्यामुळे ग्राहकांना कामधंदा सोडून भर उन्हात तासंतास रांगेत उभे राहावे लागत आहे. विशेष म्हणजे त्यामध्ये वृद्ध पुरुष व महिलांसह सर्वसामान्य नागरिकांचे यामुळे प्रचंड हाल होत आहेत.

तरी शासनाच्या नियमानुसार गॅस सिलेंडर घरपोच देणे बंधनकारक असताना एजन्सी मालकाने नियम धाब्यावर बसवत गॅस सिलेंडरची घरपोच सेवा बंद ठेवून ग्राहकांचे हाल अपेष्टा, पिळवणूक सुरूच ठेवले आहे. त्यामुळे मा जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ गॅस एजन्सी धारकाला आदेश देऊन पूर्ववत सिलेंडर घरपोच सेवा सुरू करावी आणि ग्राहकांची होणारी गैरसोय दूर करावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील यांच्यासह देगलूर बिलोली विधानसभा मतदारसंघ प्रमुख मा श्री पांडुरंग पाटील थडके देगावकर, शिवसेना देगलूर शहर प्रमुख मा श्री भगवान जाधव युवा सेना शहर प्रमुख मा श्री विनोद सोनकांबळे, युवा सेना शहर समन्वयक श्री संतोष कांबळे, सायलूसेठ हनमन्लू शहापूरकर आदींची उपस्थिती होती.

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

दैनिक महाराष्ट्र जीत
शुक्रवार, २९ मे २०२६


# कल्याणच्या दुर्गाडी परिसरात तणाव

## रस्त्यावर आरती, घोषणाबाजी! आंदोलक आक्रमक, बॅरिकेडसवर चढले, पोलिसांकडून धरपकड

महाराष्ट्र जीत

**भिवंडी,(सुनील झळके)** : कल्याणचा ऐतिहासिक दुर्गाडी किल्ला आणि गेल्या ४० हून अधिक वर्षांपासून धगधगत असलेला धार्मिक वाद यंदाच्या बकरी ईदच्या निमित्ताने पुन्हा एकदा पेटला आहे. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने बकरी ईदच्या दिवशी हिंदू भाविकांना दुर्गाडीवरील मंदिरात प्रवेश बंदी घातली आहे. तर दुसरीकडे, वर्षातील इतर दिवशी किल्ला परिसरात कोणत्याही प्रकारच्या इस्लामी उपासनेला मनाई करण्यात आली आहे. प्रशासनाच्या निर्णयाविरोधात शिवसेना शिंदे गट, ठाकरे गट आणि भाजपच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन केले.

प्रशासनाने केलेल्या मनाई आदेशाविरोधात गुरुवारी सकाळीच शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी दुर्गाडी किल्ल्यावर आक्रमक होत जोरदार आंदोलन केले. यावेळी आंदोलकांनी दुर्गाडी किल्ल्यावर प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी त्यांना अटकाव करत ताब्यात घेतले. पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त ठेवला असून बॅरिकेट्सही उभे केले आहेत. या आंदोलनाच्या परिणामी परिसरात काहीशी तणावपूर्ण स्थिती आहे. यंदाच्या आंदोलनात दोन्ही शिवसेना



गटांसोबत भाजपचे कार्यकर्तेही सहभागी झाल्याने राजकीय वातावरण अधिकच तापले आहे.

**काय आहे नेमका वाद?**

दुर्गाडी किल्ल्याच्या माथ्यावर ऐतिहासिक दुर्गा देवीचे मंदिर आहे, तर किल्ल्याच्या पायथ्याशी ईदगाह आहे. हिंदू संघटनांचा दावा आहे की हे मूळचे दुर्गा देवीचे स्थान आहे, तर मुस्लीम समाजाकडून तिथे ईदगाह असल्याचा दावा केला जातो. गेल्या ५० वर्षांहून अधिक काळ हा वाद सुरू असून सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

१९८२ मध्ये शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी ईदच्या दिवशी हिंदू भाविकांना होणाऱ्या प्रवेश बंदीला विरोध केला होता. त्यांच्याच आदेशानुसार १९८६ मध्ये तत्कालीन शिवसेनेचे जिल्हाप्रमुख आनंद दिघे यांनी 'घंटानाद आंदोलन' सुरू केले होते. तेव्हापासून दरवर्षी बकरी ईदला येथे आंदोलनाची ठिणगी पडते.

सध्या न्यायालयाचा अंतिम निकाल प्रलंबित असल्याने प्रशासनाकडून येथे तात्पुरती व्यवस्था केली जाते. सुरक्षेचा उपाय म्हणून राज्य राखीव पोलीस दलाची / तुकडी आणि स्थानिक पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त या परिसरात तैनात करण्यात आला आहे.

## शेलगाव राजगुरे येथे रासायनिक खतांचा संतुलित वापर व खरीप हंगामपूर्व मार्गदर्शन चर्चासत्र उत्साहात संपन्न

महाराष्ट्र जीत

**वाशिम (प्रतिनिधी)** : भारतीय कृषी अनुसंधान परिषद नवी दिल्ली पुरस्कृत कृषी विज्ञान केंद्र, वाशिम यांच्या वतीने बुधवार दिनांक २७ मे २०२६ रोजी मौजे शेलगाव राजगुरे येथे विठ्ठल रुक्माई गजानन महाराज मंदिर परिसरात "रासायनिक खतांचा संतुलित वापर, हळद व संत्रा पिक व्यवस्थापन" या विषयावर चर्चासत्र कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ प्रमुख डॉ.आर.एल.काळे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचलन अमन नागोराव वाघ यांनी केले.कार्यक्रमामध्ये जमिनीचे आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी रासायनिक खतांचा संतुलित व कार्यक्षम वापर,माती परीक्षणाचे महत्त्व, सेंद्रिय व जैविक खतांचा



समन्वित वापर, सूक्ष्म अन्नद्रव्य व्यवस्थापन तसेच खतांचा अतिरेकी वापर टाळण्याबाबत शास्त्रीय मार्गदर्शन करण्यात आले. यासोबतच खरीप हंगामात हळद व संत्रा पिकांमध्ये उत्पादनवाढीसाठी आवश्यक सुधारित तंत्रज्ञान, रोग-कीड व्यवस्थापन व पाणी व्यवस्थापनाबाबत माहिती देण्यात आली.कृषी विज्ञान केंद्र, वाशिम येथील फलोत्पादन तज्ञ श्री. निवृत्ती पाटील यांनी संत्रा बागेतील पोषण व्यवस्थापन, फळगळ नियंत्रण, छाटणी व संतुलित खत व्यवस्थापन यावर मार्गदर्शन केले. तसेच पशुविज्ञान तज्ञ श्री. मयूर देशमुख यांनी दुग्ध व्यवसाय, शेळीपालन व कुक्कुटपालनातील संतुलित आहार, आरोग्य व्यवस्थापन, लसीकरण व उत्पादनवाढीच्या आधुनिक तंत्रज्ञानाबाबत माहिती दिली. यावेळी शेतकऱ्यांनी खत व्यवस्थापन, पीक संरक्षण व पूरक व्यवसायांबाबत विविध प्रश्न विचारून तज्ज्ञांकडून शंका निरसन करून घेतले. कार्यक्रमामुळे शाश्वत शेती, जमिनीची सुपीकता संवर्धन आणि उत्पादन खर्च कमी करून उत्पन्न वाढविण्याबाबत शेतकऱ्यांमध्ये जागरूकता निर्माण झाली.कार्यक्रमास नागोराव वाघ, विलासराव वाघ, मोहनराव वाघ, अनिल अशोकराव वाघ, अरुण विलासराव वाघ, सौरभ वाघ, सागर वाघ, अतुल वाघ, शिवाजी वाघ , सचिन वाघ, गजानन वाघ रामदास वाघ, सचिन रंगराव वाघ, केशवराव वाघ, एकना वाघ, अक्षय विलासराव वाघ, तेजस वाघ व इतर प्रगतशील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जनगणना योद्ध्यांचा सन्मान : घराघरात जाऊन नोंदणी करणाऱ्या प्रगणकांचा तहसीलदारांच्या हस्ते गौरव

महाराष्ट्र जीत

**वाशिम (प्रविण पट्टेबहादुर)** : "जनगणना ही केवळ आकडेवारी नाही, तर देशाच्या विकासाचा आरसा आहे," या भावनेतून जनगणना 2026 च्या पहिल्या टप्प्यातील घर यादी व घर नोंदणीचे काम यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या 4 प्रगणकांचा तहसीलदार मा. निलेश पळसकर यांच्या हस्ते बुधवारी, दि. 28 मे रोजी विशेष सत्कार करण्यात आला.

तहसील कार्यालयातील दालनात दुपारी 2 वाजता आयोजित समारंभात खंडाळा खुर्दचे ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन, नागठाणाचे माधव उत्तम जाधव, झाकलवाडीच्या अर्चना ज्ञानबा कांबळे व विळेगावचे गणेश गोटे या प्रगणकांना शाल, श्रीफळ व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

"खडतर परिस्थितीतही काम" – तहसीलदार





सत्कारप्रसंगी बोलताना तहसीलदार पळसकर म्हणाले, "कडक उन्हात, दुर्गम वस्त्यांवर जाऊन प्रत्येक घराची नोंद या प्रगणकांनी अचूकपणे केली. डिजिटल माध्यमातून एकही घर सुटणार नाही याची दक्षता घेतली. यांचे काम इतरांसाठी प्रेरणादायी आहे."

यावेळी फिल्ड ट्रेनर व पर्यवेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. घर यादी म्हणजे जनगणनेचा पाया असून त्यावरच पुढील लोकसंख्या नोंदणी अवलंबून असते,असे मत पर्यवेक्षकांनी व्यक्त केले.

सत्कारमूर्तींची प्रतिक्रिया

"गावातील प्रत्येक कुटुंबाने

**खंडाळा खुर्द, नागठाणा, झाकलवाडी, विळेगाव येथील 4 प्रगणकांचा सत्कार; 'जनगणना 2026' चे काम वेळेत पूर्ण**

सहकार्य केले म्हणूनच हे काम शक्य झाले," असे सत्काराला उत्तर देताना ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन म्हणाले. सौ. अर्चना कांबळे यांनी महिलांनी दिलेल्या प्रतिसादाबद्दल समाधान व्यक्त केले.

जनगणना 2026 – पुढचा टप्पा

घर यादी पूर्ण झाल्यानंतर आता फेब्रुवारी 2027 मध्ये प्रत्यक्ष लोकसंख्या नोंदणीला सुरुवात होणार आहे. नागरिकांनी प्रगणकांना योग्य माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## धाड अजिंठा बुध्द विहार येथे दहावी व बारावी विद्यार्थ्यांचा गुणगौरव सत्कार व मार्गदर्शन



महाराष्ट्र जीत

**बुलडाणा,(प्रतिनिधी)-** बुलढाणा तालुक्यातील ग्राम धाड येथील अजिंठा बुद्ध विहार धाड येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दहावी व बारावी गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सत्कार व मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते,कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रवीण चाटे तर प्रमुख अतिथी म्हणून धाड नगरीचे प्रथम नागरिक सरपंच सावित्रीबाई सत्यवान बोर्डे तथा धाड नगरीच्या पोलीस पाटील नंदाताई प्रमोद बोर्डे हे होते.

कार्यक्रमाची सुरुवात तथागत भगवान गौतम बुद्ध,परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेसमोर दीप,धुप प्रज्वलित करून प्रतिमांना हार घालण्यात आले सामुहिक बुद्ध वंदना घेऊन या कार्यक्रमाला सुरुवात केली,कार्यक्रमाला सुरवात झाल्यानंतर मान्यवरांचे स्वागत केल्या गेले,नंतर दहावी व बारावीतील विद्यार्थ्यांचे स्वागत हे कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख अतिथी यांच्या हस्ते करण्यात आले तसेच विहाराचे संस्थापक अध्यक्ष सुनिल नरेंद्र बोर्डे (सेवानिवृत्त रेल्वे अधिकारी),संतोषराव जाधव (मुख्याध्यापक),जितेंद्र बोर्डे व गावातील जेष्ठ महिला उपासिका मानकर्णाबाई बोर्डे,सरुबाई थोरात,प्रयागबाई बोर्डे,लक्ष्मीबाई हिवाळे,शोभाबाई बोर्डे,संगीताबाई थोरात,वंदनाबाईबोर्डे,अरुणाबाईबोर्डे,वैशालीबाई बोर्डे,रूपालीबाई थोरात,विद्याबाई बोर्डे यांनी दहावी व बारावी या विद्यार्थ्यांचा सत्कार केला विद्यार्थ्यांमध्ये अनेक विद्यार्थी प्राविण्यसह उत्तीर्ण झाले,यानंतर मान्यवरांचे मनोगत व्यक्त करण्यात आले यावेळी डॉ.चाटे यांच्या वतीने मनोगत व्यक्त करण्यात आले शैक्षणिक जीवनासह व्यावसायिक जीवनाकडे पण वळा हा त्यांचा मोलाचा सल्ला होता,नीट पेपर फुटी बद्दल बोलताना डॉ.चाटे बोलत होते की ढासळून जाऊ नका अभ्यास करत रहा येणारा पर्व आपलाच आहे,विद्यार्थ्यांनी अभ्यास लक्ष पुर्वक केला पाहिजे यातच यश दडलेले आहे

असे मोलाचे मार्गदर्शन केले, कार्यक्रमाची सांगता करण्यापूर्वी आभार प्रदर्शन डॉ.प्रवीण बोर्डे धर्मसेवक तथा व्यवस्थापक यांनी सर्वांचे आभार मानले,हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कबीर बोर्डे,दर्शन चव्हाण,सम्यक बोर्डे सुमित चव्हाण,सुमेधा थोरात या सर्व विद्यार्थ्यांनी मेहनत घेतली या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचे आई-वडील,तरुण विद्यार्थी मित्र वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते हे महत्वाचे,अजिंठा बुद्ध विहार धाड मार्फत असे अनेक प्रेरणादायी व धम्ममय कार्यक्रम चालतात व असे कार्यक्रम घडवून आणण्यासाठी डॉ.प्रविण एस.बोर्डे (धम्मसेवक) मेहनत घेतात अशी सर्व पंचक्रोशीत चर्चा चालू आहे.

## कृषी अभियानांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी यंत्रणांनी समन्वयाने काम करावे : जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर

महाराष्ट्र जीत

**रिसोड प्रतिनिधी भाऊसाहेब सरनाईक** : वाशिम जिल्ह्यात कृषी उत्पादनवाढ, अन्न सुरक्षा बळकटीकरण आणि शेतकरी सक्षमीकरणाच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या कडधान्य आत्मनिर्भरता अभियान, राष्ट्रीय खाद्यतेल अभियान–तेलबिया तसेच राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिल्या.

जिल्हास्तरीय आढावा बैठकीत बोलताना त्यांनी कृषी विभागासह सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयातून काम करून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले.

**कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत**

• कडधान्य लागवड, उत्पादन व उत्पादकता वाढीसाठी वार्षिक कृती आराखडा

•प्रमाणित बियाण्यांचे वितरण

•शेतकरी प्रशिक्षण व शेतीशाळा

•कृषी विज्ञान केंद्रामार्फत समूह प्रात्यक्षिके

•प्रक्रिया युनिट स्थापनेसाठी विविध घटकांचा समावेश

**राष्ट्रीय खाद्यतेल अभियान–तेलबिया अंतर्गत**

•तेलबिया उत्पादनवाढीसाठी मूल्य साखळी भागीदार निवड प्रक्रिया

•बियाणे वितरण व प्रशिक्षण कार्यक्रम

• पीक विमा, सूक्ष्म सिंचन व कृषी पत योजनांशी शेतकऱ्यांना जोडण्यावर भर

•सुधारित तंत्रज्ञान व वाणाबाबत क्षमता विकास

**राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियानांतर्गत**

• भात, गहू, मका व पौष्टिक तृणधान्यांचा समावेश

• पीक प्रात्यक्षिके व कीड व्यवस्थापन

•प्रमाणित बियाणे वितरण

• कृषी जिल्हा महोत्सवाचे आयोजन

खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर खत, बियाणे व कीडनाशकांचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवण्याच्या तसेच दर्जेदार निविष्ठांचा पुरवठा सुनिश्चित करण्याच्या सूचना बैठकीत देण्यात आल्या.

**जिल्ह्यात खरीप हंगामासाठी**

•१ लाख ४६ हजार ७६० मे.टन खतांची मागणी

•७८ हजार ७०० मे.टन खत आवंटनास मंजुरी

•१५ हजार ३९२ मे.टन खतांचा प्रत्यक्ष पुरवठा

•३५ हजार ९७० मे.टन खतांचा शिल्लक साठा उपलब्ध

सोयाबीनसह विविध पिकांसाठी आवश्यक बियाण्यांच्या पुरवठा, विक्री व साठा स्थितीचाही बैठकीत आढावा घेण्यात आला.

बैठकीस जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शाहा, आत्मा प्रकल्प संचालक अनिसा महाबळे, उपविभागीय कृषी अधिकारी संतोष वाळके, कृषी उपसंचालक हिना शेख, कृषी विकास अधिकारी अभिजित देवगीरकर तसेच कृषी संबंधित अधिकारी व समिती सदस्य उपस्थित होते.

## कारंजा ब्लाक कॉंग्रेस कमीटी सेवादल शहर अध्यक्षपदी प्रदीपभाई वानखडे यांची नियुक्ती

महाराष्ट्र जीत

**नकुल उपाध्ये / कारंजा प्रतीनीधी:** महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमीटी कारंजा ब्लॉक सेवादल शहर अध्यक्ष पदी प्रदीपभाई विनायकराव वानखडे यांची नियुक्ती नुकतीच कॉंग्रेस कमीटी सेवादल प्रदेश अध्यक्ष विलास अवताडे यांनी नियुक्ती पत्र देऊन केली आहे .

प्रदीप भाई वानखडे हे खेर्डा जीरापुरे गावचे माजी सरपंच तथा निष्ठावान कॉंग्रेस कार्यकर्ते म्हणून सर्वदूर परीचीत आहेत . माजी खासदार गुलाम नबी



आझाद; माजीमंत्री अनंतराव देशमुख; विकास पुरुष माजी मंत्री बाबासाहेब धाबेकर; केशवराव खोपे यांचे ते निष्ठावंत म्हणून त्यांचा परीचय आहेत . आजही कॉंग्रेस संघटण तथा पक्षाचे



ध्येयधोरण सामान्य जनतेपर्यन्त पोहोचविनारे पक्षनिष्ठ कार्यकर्ते म्हणून त्यांचे कडे पाहले जाते . त्यांच्या कार्याची दखल घेत जिल्हा कॉंग्रेसने त्यांचे कडे कारंजा शहराची जबाबदारी सोपविली आहे त्यांच्या नियुक्तीचा आनंद त्यांच्या चाहत्यांनी व्यक्त केला आहे .

## शेतकऱ्यांनी सोयाबीन पेरणीसाठी योग्य खबरदारी घ्यावी - अविनाश राठोड

महाराष्ट्र जीत

**मंठा:प्रतिनिधी ज्ञानेश्वर पवार :** दि. 28 मे 2026 राज्यात खरीप हंगामाची सुरुवात शेतकरी करत आहे.महत्त्वाचे पीक म्हणून सोयाबीन कडे बघितले जाते. सध्या परिस्थिती बघता मशागतीमध्ये नांगरनी,पाळी, रोटावेटर ,इतर कामामध्ये शेतकरी व्यस्त आहे.सोयाबीन पिकाच्या लागवडीकरिता मध्यम काळी पायट्याची पाण्याचा निचरा होणारी जमिनीची निवड करावी.कडक उन्हात नागरणी करावी त्याचप्रमाणे दोन पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करावी,शेवटच्या पाळी बरोबर शेणखत चांगले कुजू द्यावे.10 टन प्रती हेक्टर शेणखताचा वापर करावा. शेतकऱ्याचा मित्र म्हणून बीबीएफ यंत्राकडे बघितले जाते.या यंत्राद्वारे शास्त्रशुद्ध पद्धतीने दोन सऱ्या तयार करून गादीवाफा तयार करावे ,गादीवाफामुळे पिकांची वाढ चांगली होतें,सरिद्वारे अतिरिक्त पाणी शेता बाहेर जाते,आणि पाण्याचे प्रमाण कमी- जास्त प्रमाणात



झाल्यास आपले पिक सुरक्षित राहण्यास उपयोग होतो. शक्यतो शेतकऱ्यांनी सोयाबीन सोबत आंतरिक पिक म्हणून तुरीची निवड 3:1 अशा प्रमाणात करावी.नत्र स्थिर करण्यासाठी,स्फुरद उपलब्धतेसाठी जमीन ही बुरशीजन्य रोगापासून वाचवण्यासाठी रायझोबियम व पीएसबी जिवाणू संवर्धक प्रत्येकी

1)माती परीक्षण,
2)उगवण क्षमता,
3)बीज प्रक्रिया,
4)बांधावर जैविक खताची निर्मिती,
5)जाळलेल्या विविध वनस्पतीचा बायोचार चा उपयोग करावा,
6)बीबीएफ मशीन चा वापर करावा,

25 ग्रॅम व ट्रायकोडर्मा 5 ग्रॅम प्रति किलो बियाण्यास बीजप्रक्रिया न चुकता करावी. मुख्य पिकाच्या भवती एरंड,सूर्यफूल ई सापळा पिकाची निवड करावी. सोयाबीनची पेरणी ही 5 सें.मी.च्या खाली करू नये.अश्या ई.खबरदाऱ्या शेतकऱ्यांनी घ्याव्या असे आव्हान रयत शेतकरी गटाचे अध्यक्ष अविनाश राठोड यांनी केले आहे...

## भाज्यांचा भाव कडाडले, जेवण बेचव झाले
### ठाणे,भिवंडी,मीरा-भाईंदर, नवी मुंबई, वसई येथे भरमसाठ दर वाढले



“ गेल्या दोन आठवड्यांपासून भाजीपाल्याच्या दरात सातत्याने वाढ होत असून, काही भाज्यांच्या दरात आधीच ४० ते ५० टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे.

दीपक गुप्ता, व्यापारी, एपीएमसी

“ दरवर्षी पावसाळा सुरू झाल्यावर भाव वाढायचे, पण यावर्षी तर उन्हाळ्यातच भाव वाढले आहेत. पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या किमतींमुळे वाहतूकदारांनी मालवाहतुकीचे दर वाढवले आहेत.

- राजेश प्रजापती, व्यापारी, एपीएमसी

“ पेट्रोल डिझेल व इतर इंधनाच्या वाढत्या किमती पाहता, महागाई दररोज वाढत चालली आहे. त्यामुळे भाजीपाला, चिकन, खाद्यपदार्थ इत्यादी खाण्या-वापरण्याच्या वस्तूंच्या किंमतही सारखीच वाढ होत असल्याकारणाने, कुटुंबाची आर्थिक आवक पाहता, महागाईमुळे जगणे मुश्किल होत चालले आहे.

कांता धोंडाळे,गृहिणी

महाराष्ट्र जीत

**भिवंडी,(सुनील झळके) :** वाढत्या भाजीपाला दरांमुळे सर्वसामान्य लोकांच्या खर्चाचे नियोजन विस्कळीत झाले आहे. गेल्या काही दिवसांत टोमॅटो, बटाटे आणि हिरव्या भाज्यांच्या दरात मोठी वाढ झाली आहे. अनेक कुटुंबांनी हिरव्या भाज्यांची खरेदी कमी केली आहे. भाजीपाल्याच्या बाजारात ग्राहकांची गर्दी असली तरी, लोक आता अर्धा किंवा एक किलोऐवजी पाव किलो भाज्या खरेदी करत आहेत.भिवंडीमध्ये टोमॅटोचे दर ४० रुपयांवरून ८० रुपये प्रति किलोपर्यंत वाढले आहेत.ठाणे शहरात बटाट्याचे भाव प्रति किलो ५-६ रुपयांनी वाढले आहेत. भेंडीचे भाव प्रति किलो १० रुपयांनी, तर फुलकोबीचे भाव २-४ रुपयांनी वाढले आहेत. दरम्यान, नवी मुंबईत भाजीपाल्याच्या दरात जवळपास ५० टक्क्यांनी वाढ झाली आहे. याशिवाय, भिवंडीत टोमॅटोचे भाव प्रति किलो ४० रुपयांवरून जवळपास ८० रुपयांपर्यंत वाढले आहेत.अनेक गृहिणींचे म्हणणे आहे की, गॅस सिलिंडर, दूध आणि शिधा आधीच महाग असताना, भाजीपाल्याच्या वाढत्या किमतींमुळे घरगुती बजेटवर अतिरिक्त भार पडला आहे. खर्च कमी करण्यासाठी अनेक कुटुंबे आता जेवणात बदल करत आहेत.

## राष्ट्रीय मीडीया महा संम्मेलन माऊन्ट अबू येथे आयोजीत ; पत्रकारानी या सम्मेलनात सहभागी व्हावे

### राजयोगी मालती दिदि; राज योगी सिता दिदि यांनी केले आवाहन

महाराष्ट्र जीत

**नकुल उपाध्ये / कारंजा लाड :** श्रेष्ठ विश्व निर्मीती साठी सशक्त मिडीयाचे मंथन करीता देशभरातील पत्रकार ब्रम्हा कुमारीज मुख्यालय आबुरोड माऊन्ट अबू येथे दि ९ते १३ सप्टेंबर रोजी सहभागी होत आहेत तेव्हा या महासम्मेलनाचा लाभ पत्रकार बांधवानी घ्यावा असे आवाहन कारंजा ब्रम्हा कुमारीज केंद्राच्या प्रमुख राजयोगी मालती दिदि; अमरावती केंद्राच्या राजयोगी सिता दिदि यांनी केले आहे .

माध्यमांच्या सकारात्मक भूमिकेला केंद्रस्थानी ठेऊन राष्ट्रीय मीडीया महासम्मेलन दि ९ ते १३ सप्टेबर२०२६ पर्यन्त ब्रम्हा कुमारीज मुख्यालय मानसरोवर परीसर आबू रोड



राजस्थान येथे आयोजीत आहे . या महासम्मलनाची मुख्य संकल्पना श्रेष्ठ विश्व निर्मीती साठी सशक्त मीडीया अशी आहे . देशभरातील पत्रकार संपादक न्यूज अँकर डिजीटल मीडीया तज्ञ यू ट्यूबर्स सोशल मिडीया कंटेंट क्रिएटर्स तसेच जनसंपर्क व प्रसार माध्यम क्षेत्रातील मान्यवरांचा हा राष्ट्रीय संगन



ठरणार आहे . तेव्हा इच्छूक सहभागी होणाऱ्यानीजवळच्या ब्रम्हा कुमारी केंद्रामार्फत ऑन लाईन नोंदी करावी . नोंदणी विनामुल्य असून पूर्व नोंदणी अनिवार्य आहे . तेव्हा या सम्मेलनाचा पत्रकारांनी लाभ घ्यावा असे आवाहन कारंजा केंद्र प्रमुख राजयोगी मालती दिदि; अमरावती केंद्र प्रमुख राजयोगी सिता दिदि; राज्य संयोजक डॉ सोमनाथ वडनेरे यांनी केले आहे .

## माणूस परिवार महाराष्ट्र राज्य प्रणित आदर्श कार्यकर्ता गौरव समितीतर्फे समाज भूषण पुरस्कार जाहीर : शरद निकम

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी शाम जगताप :** किल्ले मच्छिंद्रगड येथील रहिवासी शरद निकम यांची माणूस परिवार महाराष्ट्र राज्य प्रणित आदर्श कार्यकर्ता गौरव समितीचे कार्यकारी अध्यक्ष तसेच कार्यक्रमाचे आयोजक दुष्यंतराजे जगताप व त्यांच्या निवड समितीने सामाजिक कार्यकर्ते शरद निकम यांची समाजभूषण पुरस्कारासाठी निवड केलेली आहे.

हा पुरस्कार सोहळा ०२ जुन रोजी पुणे येथील गणेश हॉल, न्यू इंग्लिश स्कूल ,टिळक रोड नवीपेठ येथे होणार आहे.

शरद निकम हे त्यांच्या भागातील कराड ,सातारा , वाळवा या परिसरात सामाजिक कार्यकर्ते म्हणून ओळखले






जातात समाजाबद्दल समाज उपयोगी असे भरपूर उपक्रम ते नेहमी राबवत असतात व गरजूवंत लोकांना नेहमी मदत करतात व मदत मिळवून देण्यासाठी नेहमी तत्पर असतात रक्तदान शिबिर ,आश्रमात गोरगरिबांना औषधे धान्य तसेच मच्छिंद्रनाथ गडावर महाप्रसाद देणाऱ्यांना नाताचा फोटो देऊन शाल श्रीफळ देऊन सत्कार करतात वाढदिवसानिमित्त झाडे लावून संगोपन केले जाते कोरोना काळात कोरोना योद्धा म्हणून सन्मानित केले आहे ,मूकबधरी शाळेत मुलांचा वाढदिवस साजरा केला ,जिल्हा परिषद शाळेत पुस्तके वही पेन टेबल खुर्च्या वाटप केले, असे अनेक सामाजिक उपक्रम राबवत असतात तसेच ते विविध संस्था व संघटनांमध्ये सुद्धा काम करता युवा ग्रामीण पत्रकार संघ सातारा,सांगली जिल्हा उपाध्यक्ष,झेप फाउंडेशन पुणे महाराष्ट्र राज्य वाळवा तालुका सचिव ,टायगर ग्रुप वाळवा तालुका अध्यक्ष पदावर कार्यरत आहेत शरद निकम यांना समाजभूषण पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल डॉ. सुरेश बाबा भोसले माजी चेअरमन यांनी शुभेच्छा दिल्या आहेत

## काजळेश्वर ग्रामपंचायत प्रकरणात सरपंच नितीन उपाध्ये यांची बाजू ठरली भक्कम

### अपर आयुक्तांचा अपात्रतेचा आदेश अखेर मंत्रालयाकडून रद्द ; नियमांचे पालन करूनच कामे केल्याचा दावा

महाराष्ट्र जीत

**नकूल उपाध्ये / कारंजा लाड:** कारंजा तालुक्यातील काजळेश्वर ग्रामपंचायतीतील अपात्रता प्रकरणात सरपंच नितीन विष्णू उपाध्ये यांची बाजू कायदेशीरदृष्ट्या भक्कम असल्याचे चित्र आता समोर आले आहे. अप्पर आयुक्त अमरावती विभाग यांनी दिलेल्या अपात्रतेच्या आदेशाविरोधात सरपंच उपाध्ये यांनी थेट ग्रामविकास मंत्री यांच्या न्यायालयात धाव घेतली असून मंत्रालयाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत सुनावणी दरम्यान अप्पर आयुक्तांच्या आदेशाला रद्द ठरविले आहे.१३ ऑक्टोबर २०२५ रोजी अप्पर आयुक्तांनी सरपंच नितीन उपाध्ये यांना अपात्र घोषित केले होते. मात्र या आदेशाविरोधात त्यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम ३९(३) अंतर्गत अपील दाखल करत आपली बाजू प्रभावीपणे मांडली. १७ फेब्रुवारी २०२६ रोजी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे झालेल्या सुनावणीत उपाध्ये यांनी ग्रामपंचायतीने सर्व



कामे शासन नियमांनुसार आणि विभागीय पद्धतीने केल्याचा ठाम दावा केला.

या प्रकरणात आयुर्वेदिक दवाखान्याची आवारभिंत, पोचमार्ग, ड्रेनेज, अंतर्गत रस्ते व नाली बांधकाम यासह विविध विकासकामांमध्ये अनियमितता झाल्याचे आरोप करण्यात आले होते. तसेच ई-निविदा प्रक्रिया न राबविणे, साहित्य पुरवठ्यापूर्वी देयके अदा करणे आणि निधी अपहाराचे आरोपही तक्रारीत करण्यात आले होते. मात्र सुनावणी दरम्यान सरपंच नितीन उपाध्ये यांनी हे सर्व आरोप तथ्यहीन असल्याचे स्पष्ट केले.ग्रामपंचायतीने विभागीय स्तरावर स्वत: साहित्य खरेदी करून कामे पूर्ण केली असल्याने ई-निविदा प्रक्रिया बंधनकारक नसल्याचा मुद्दा त्यांनी ठोसपणे मांडला. सार्वजनिक बांधकाम विभागाचे शासन निर्णय हे कंत्राटी कामांसाठी लागू होतात, ग्रामपंचायतीच्या विभागीय कामांवर नाहीत, असा महत्त्वपूर्ण युक्तिवादही त्यांनी केला. त्यामुळे प्रशासनाकडून करण्यात आलेल्या कारवाईत तांत्रिक

**सत्य पराजीत नही होता; केलेले आरोप राजकीय सुडबुद्धीने**
**नितीन पाटील उपाध्ये**
**सरपंच ग्राम पंचायत**
**काजळेश्वर ता कारंजा .**

व कायदेशीर त्रुटी असल्याचे स्पष्ट झाल्याची चर्चा सुरू होती .महत्त्वाचे म्हणजे अप्पर आयुक्तांचा आदेश महाराष्ट्र ग्रामविकास व पंचायत राज मंत्री ना. जयकुमार गोरे न्यायालयाकडून रद्द झाल्याने सरपंच नितीन पाटील उपाध्ये यांची बाजू मजबूत असल्याचे राजकीय व प्रशासकीय वर्तुळात बोलले जात आहे. ग्रामपंचायत स्तरावरील विकासकामांमध्ये विरोधकांकडून राजकीय हेतूने तक्रारी करण्यात आल्याचाही आरोप त्यांच्या समर्थकांकडून करण्यात येत आहे.

या प्रकरणी महाराष्ट्र ग्रामविकास व पंचायत राज मंत्री न्यायालयाने दि .२५ मे २०२६ च्या आदेशान्वये अपिलार्थी नितीन विष्णू उपाध्ये सरपंच ग्राम पंचायत काजळेश्वर चे अपील मान्य करण्यात येत आहे . अप्पर आयुक्त यांनी पारित केलेला अपात्रतेचा १३ .१० .२५आदेश रद्द करण्यात येत आहे . सर्व समंधीत अधीकारी / प्राधीकारी यांनी या आदेशाची तात्काळ अंमल बजावनी करावी . सदर आदेश सर्व समंधीतांना कळविन्यात यावा असे आदेशात म्हटले आहे .

## दापुरी खुर्द येथे रासायनिक खतांचा संतुलित वापर जनजागृती अभियान व खरीप हंगामपूर्व वैज्ञानिक चर्चासत्र उत्साहात संपन्न

महाराष्ट्र जीत

**वाशिम(समताशाही) :** भारतीय कृषी अनुसंधान परिषद (ICAR) व कृषि विज्ञान केंद्र, वाशिम यांच्या मार्गदर्शनाखाली देशभर राबविण्यात येत असलेल्या “रासायनिक खतांचा संतुलित वापर जनजागृती अभियान” अंतर्गत दिनांक २६ मे २०२६ रोजी मौजे दापुरी खुर्द येथे ग्रामपंचायत कार्यालयात खरीप हंगामपूर्व शेतकरी मार्गदर्शन व जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ.आर.एल.काळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमास परिसरातील शेतकरी बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रगतशील



शेतकरी श्री. अंकुश खुशालराव तायडे हे उपस्थित होते. मार्गदर्शक म्हणून कृषि विज्ञान केंद्र, वाशिम येथील शास्त्रज्ञ डॉ. एस. के. देशमुख व श्री. टी. एस. देशमुख यांनी उपस्थित शेतकऱ्यांना वैज्ञानिक माहिती दिली.प्रास्ताविकात विषय विशेषज्ञ (कृषि विस्तार) डॉ. एस. के. देशमुख यांनी मृदा परीक्षणावर आधारित खत व्यवस्थापन, हिरवळीच्या खतांचा वापर, सेंद्रिय व रासायनिक खतांचा समतोल वापर तसेच एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन या विषयांवर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी जमिनीचे आरोग्य टिकवून उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी मृदा आरोग्य पत्रिकेच्या शिफारशींनुसार खतांचा वापर करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच रासायनिक खतांचा अतिरेकी व असंतुलित वापर टाळून शाश्वत शेती पद्धतीचा अवलंब करण्याचे आवाहन केले.विषय विशेषज्ञ (कृषि विद्या) श्री. टी. एस. देशमुख यांनी खरीप हंगामपूर्व नियोजनामध्ये मृद व जलसंधारण तंत्रज्ञान, गंधकयुक्त खतांचे महत्त्व, बियाणे प्रक्रिया तंत्र, सुधारित खरीप पिकांच्या वाणांची निवड तसेच जैविक व सेंद्रिय निविष्ठांच्या उत्पादन व वापर तंत्रज्ञानाविषयी सविस्तर माहिती दिली. त्यांनी हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी हवामान अनुकूल शेती तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याची आवश्यकता स्पष्ट केली. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांच्या विविध कृषी विषयक शंकांचे समाधानकारक निरसन करण्यात आले.माती परीक्षण प्रयोगशाळा प्रभारी श्री. गंगाधर काळे यांनी माती नमुना संकलनाची शास्त्रीय पद्धत प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे समजावून सांगितली. तसेच माती परीक्षण अहवालाचे विश्लेषण करून पिकनिहाय संतुलित खत व्यवस्थापन कसे करावे याबाबत मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमास गावातील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री. प्रविण जाधव यांनी केले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पाठीशी सावलीसारख्या उभ्या राहिल्या त्यागमूर्ती रमाई - सिद्धार्थ वाहुळे

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत / प्रदीप पोटफोडे :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समवेत ज्यांनी स्वतः आयुष्यभर अपार दुःख सहन केलं पण पतीच्या स्वप्नासमोर कधीच हार मानली नाही. दारिद्र्य, उपासमार, संघर्ष आणि असंख्य वेदना सहन करत त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना खंबीरपणे साथ दिली. अनंत दुःख शोषून सदैव हसतमुखाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पाठीशी त्यागमूर्ती रमाबाई सावलीसारख्या उभ्या राहिल्या असे मत पाचोड येथील ज्येष्ठ पत्रकार सिद्धार्थ वाहुळे यांनी व्यक्त केले. येथील शिवछत्रपती महाविद्यालयामध्ये संघर्षमूर्ती रमाई आंबेडकर यांची पुण्यतिथी (दि.२७) साजरी करण्यात आली. त्यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे हे होते. संपूर्ण बहुजन समाजात मातोश्री रमाई म्हणून आदराचे स्थान असलेल्या समाजसेविका रमाबाई आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मान्यवरांनी अभिवादन केले.

यावेळी प्रमुख पाहुणे श्री सिद्धार्थ



वाहुळे यांचे शाल आणि पुष्पगुच्छ देऊन यथोचित स्वागत करण्यात आले.

बाबासाहेबांना उच्च शिक्षण घेण्यासाठी परदेशात राहावे लागले, त्या काळात रमाईंनी अत्यंत गरिबी व खडतर परिस्थितीत संसाराचा गाडा चालवला तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर देशातील वंचितांच्या हक्कासाठी लढत होते, तेव्हा रमाईंनी त्यांना प्रत्येक पावलावर मानसिक आणि कौटुंबिक आधार दिला. तब्बल 29 वर्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसोबत साथ मिळालेल्या रमाई या केवळ बाबासाहेबांच्या पत्नी नव्हत्या तर त्यांच्या संघर्षातील सावली, त्यागाची मूर्ती आणि प्रेरणेचा अखंड दीप होत्या असे गौरवोद्गार प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी काढले.

यावेळी वैभव राऊत, श्रीकांत चिंचखेडे, मनोज राक्षे, मुरलीधर झिने आदी उपस्थित होते.